# महिला सक्षमीकरण : समस्या आणि उपाय

**डॉ. चंद्रशेखर इंद्रशेखर गित्ते**
लोकप्रशासन विभाग
महिला महाविद्यालय, नंदनवन,नागपूर
Email – drcig79@gmail.com

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल व राजस्थान इत्यादी राज्यात महिलांच्या अत्याचार विषयक घटनांत आघाडीवर आहे. महाराष्ट्रात 4 लाखाच्या जवळ पास गुन्हे दाखल झाले आहे. बऱ्याच स्त्रीया अंधाराच्या खोलवर दरीत लोटल्या आहेत. एखाद्या स्त्रीला 12 वर्षे खोलीत डांबून ठेवणे, जातपंचायतीने तिच्यावर सामुहिक बलात्काराचा आदेश दिला जातो, शाळा, महाविद्यालय व सरकारी कार्यालयामध्ये उच्च पदावर विराजित असलेले अधिकारी स्त्रीयांवर मानसिक व शारीरिक छळ करीत असतात, हुंड्यासाठी अनेक स्त्रीयांचा बळी जातो, स्त्रीभृणहत्येच्या माध्यमातून ती जगात येण्यापूर्वीच तिला संपविण्याचा कट केला जातो हे भारतमातेचे दुदैव होय अशाप्रकारे स्त्री अत्याचाराचे बरेच बोलकी उदाहरणे आहेत. विधवा, घटस्फोटित आणि अविवाहित महिलांबाबत समाजात असलेली वेगळी भावना ही बाबही भारतात महिलांना सामाजिक दृष्ट्या कमी दर्जा मिळण्यास कारणीभूत आहे. परंतु हळू–हळू का होईना आता परिस्थिती बदलू लागली आहे.

भारत सरकारने 2001 हे वर्ष 'महिला सक्षमीकरण वर्ष' घोषित केली आहे त्यानुसार महिलांच्या विकासासाठी अनेक दारे उघडी झाली आहेत. प्रगतीची अनेक शिखरे तिला खुणावु लागली. प्रत्येक 'काळा ढग चंदेरी कडा घेऊन येतो' ही म्हण तिला सार्थ वाटू लागली. स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित करणे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविणे, निर्णय क्षमतेत वाढ करणे, स्त्री साक्षरतेत वाढ करणे, आत्मनिर्भर बनविणे, स्वतःविषयी जागरुक बनविणे तसेच आत्मसन्मान वाढविणे या दृष्टीने महिला सक्षमीकरणाचे पाऊल उचलले आहे त्याकरिता बऱ्याच योजना राबविल्या आहे. काही मूठभर स्त्रिया आज प्रगतीच्या उंच शिखरांपर्यंत जाऊन पोहचल्या आहेत. महिला सक्षमीकरणाचा मुद्दा केवळ भारतापुरता सिमित नाही कारण आज प्रगत म्हणविणाऱ्या व आर्थिक भरारीचे बळ गाठणाऱ्या देशातील स्त्रियांनाही आपल्या आस्तित्वासाठी व हक्कांसाठी पुकारावा लागला होता. ज्याचे पडसाद संपूर्ण जगावर उमटले व स्त्रीशक्तीला एक नवी दिशा मिळाली. भारताच्या अर्थव्यवस्थेत महिला सक्षमीकरणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रात स्त्रिया मोठ्या संख्येने व सक्षमपणे कार्य करताना दिसून येतात. काही क्षेत्रात तर स्त्रियांच्या कार्याचा वाटा पुरुषांच्या कार्यापेक्षा अधिक आहे. महिला बचत गट ही केवळ कागदावरील शासकीय योजना नसून महिला सक्षमीकरणाची एक सुप्त क्रांतिकारी चळवळ आहे. महिला बचत गटामुळे कित्येक स्त्रियांना आत्मसन्मान मिळाला आहे. भारतात 1992 च्या दरम्यान बचत गटाच्या चळवळीला खरा वेग आला. बचत गटांमुळे महिलांमध्ये संघटनशक्ती, स्वविकास व सामाजिक विकासाची जाणीव निर्माण झाली. बांग्लादेशात नोबेल पुरस्कार विजेते व बचत गटांच्या चळवळीचे जनक डॉ. महंमद युनूस यांनी राबविलेल्या बचत गटाच्या प्रयोगाला बांग्लादेशात अभूतपूर्व यश मिळाले. महिलांमध्ये बचत गटाच्या माध्यमातून कमालीचा आत्मविश्वास निर्माण झाला. या यशातून प्रेरणा घेऊन भारतानेही बचत गटांच्या माध्यमातून लघुत्तम उद्योगांना चालना देण्यास सुरुवात केली. बचत गट म्हणजे केवळ पैशांची बचत करणे एवढेच बचत गटाचे उद्दिष्ट नसून त्यांच्या हातांना काम मिळवून देणे आणि स्वमिळकतीतील आत्मसन्मान मिळवून देणे हे आहे.

**संशोधन लेखाचा उद्देश :**

सदर संशोधन लेखाचा उद्देश हा स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातुन महिला सक्षमीकरणची आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे असा आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला असून त्यात प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, नियतकालीके तसेच संकेतस्थळे इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती आणि महिलांचा सहभाग :**

महिला बचत गटांची स्थापना करतांना त्यात गरीब व दारिद्र्य रेषेखालील सभासद महिलांचा समावेश करण्यात यावा. एक महिला बचत गटात साधारणपणे 10 ते 20 महिला सभासदांचा समावेश असावा. महिला सभासदांची संख्या 20 पेक्षा जास्त नसावी. महिला बचत गटाच्या ओळखीसाठी सदर गटास नाव देण्यात येते तसेच त्या गटाच्या नावाने बँकेत खाते उघडले जाते व गटाची सभा आयोजित करण्यात यावी. महिला बचत गटाच्या सभा ह्या प्रत्येक आठवड्यात, पंधरा दिवसाला व महिन्याला ठराविक दिवशी व ठराविक वेळी घेण्यात येते. सभेची तारीख व वेळ सभेमध्ये निश्चित करण्यात यावी. गटाच्या सभेमध्ये बँकेच्या अधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात यावे जेणेकरुन त्यांच्याकडून गटाने करावयाचे व्यवहार, कर्जे, ठेवी, व्याज, नोंदी याबाबत त्यांचे मार्गदर्शन गटास होईल. बचत गटाबाबत महिती सांगताना डॉ. एम. यू. मुलानी असे म्हणतात की, 'महिलांचे सक्षमीकरण करणारा, त्यांच्या हिताची जपवणूक करणारा, लाभाचे समान वाटप करणारा, लाभाचे समान वाटप करणारा, स्वयंस्फूर्ती स्थापन होणारा, तातडीने कर्जाची गरज भागविणारा, बचतीतून उत्कर्ष साधणारा, चलनाची देवाणघेवाण करणारा, टंचाई आणि अडचणीच्या वेळी मदतीला हात देणारा गट म्हणजे महिला स्वयंसहाय्यता बचत गट होय.' बचत गट या संकल्पनेला आणि तिच्याशी जोडलेले लाखो महिलांना एक सामाजिक स्थान प्राप्त झाले असून कालपर्यंत घराच्या उंबरठ्याआड, असलेल्या या महिला आज अनेक आर्थिक व्यवहारात मोठ्या आत्मविश्वासाने उद्योग व्यवसायाचा कारभार सांभाळत आहेत. घरात, दरात आणि समाजात बचत गटाच्या महिला मानाने गावातील ग्रामसभेत आत्मविश्वासाने वावरत आहेत. बचत गटाच्या अनेक महिला स्थानिक स्वराज्य संस्थेने सत्तेचे पद भुषवत असून सामाजिक, राजकीय प्रश्नावर महिला एकत्रितपणे आवाज उठवत आहेत.

भारत सरकारने आय.आर.डी.पी., डवाक्रा, सिट्रा, ट्रायसेम, दशलक्ष विहीर योजना, गंगा कल्याण योजना या पूर्वीच्या सर्व योजनांना एकत्रित करुन 1 डिसेंबर 1997 पासून शहरी भागासाठी 'सुवर्ण जंयती शहरी रोजगार योजना' तर ग्रामीण भागासाठी 1 एप्रिल 1999 ला 'स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजना' सुरु केली. 4 या योजनेचा मूळ हेतू हा ग्रामीण गरीब, असंघटीत, बेरोजगार, दारिद्र्यात खितपत असणाऱ्या लोकांचे लहान–लहान गट तयार करुन त्यांना त्यांच्या जवळील अंगभूत कौशल्य व बचतीच्या आधारावर अनुदान तसेच कर्ज देऊन सक्षम करणे व किमान तीन वर्षाच्या आत दारिद्र्य रेषेच्या वर आणणे असा आहे. या स्थापना करण्यात येणाऱ्या गटांमध्ये महिलांच्या गटांना 40 टक्के स्थान देण्यात आले आहे. या गटांनाच 'महिला स्वयंसहाय्य बचत गट' असे म्हटले जाते. हेच गट आज महिलांच्या दारिद्र्य निर्मुलनाचे साधन ठरत आहेत.

'स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजना' ही दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना सहाय्यता करण्यासाठी राबविण्यात येणारी प्रमुख स्वयंरोजगार योजना आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना बँकेंचे अर्थसहाय्य व शासनाचे अनुदान या दोन्ही द्वारा कायमस्वरुपी उत्पन्न निर्माण करणाऱ्या साधनांचा पुरवठा करुन दारिद्र्य रेषेच्यावर आणणे हे योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. योजनेच्या सुरुवातीपासून मार्च 2012 पासून अखेर राज्यात स्थापन केलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या 2,67,314 असून त्यापैकी 95170 स्वंयसहाय्य गट कार्यरत आहे. या योजने अंतर्गत 1999 ते 2012 या कालावधीत एकूण 1,97,274,96 लाख एवढा निधी खर्च करण्यात येऊन एकूण 14,20,453 स्वयंरोजगारांना लाभ देण्यात आला आहे. तसेच एकूण रु. 3,84,357.10 लाख कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. लाभ देण्यात आलेल्या 95170 गटांनी व्यवसाय सुरु केला आहे. स्वयंसहाय्यता गटाची कल्पना जागतिक बँक, विमा कंपन्या, खाजगी क्षेत्रातील कंपन्या यांना कौतुकास्पद वाटत होती. याच दरम्यान बांग्लादेश व भारताप्रमाणे लॅटिन अमेरिका, आफ्रिका व आशियाई देशात ही चळवळ वेगाने फोफावली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी म्हणून एकता, शिस्त, साहस व कठोर

परिश्रम यांचा मिलाफ साधून मलेशियन अर्थतज्ज्ञ प्रा. गिब्बसन यांनी मलेशिया राष्ट्रात ही योजना राबविली आहे. तसेच भारतासह, श्रीलंका, फिलीपाईन्स, आफ्रिकेतील देश, दक्षिण अमेरिकेतील देश या देशांमध्ये ही चळवळ कार्यरत आहे.

बचत ही नवीन संकल्पना नव्हती. जगात फंड, भिशी अशा वेगवेगळ्या स्वरुपात बचत चालू होती. दक्षिण अमेरिका व आफ्रिका भागात ROSCA (Rotating Saving & Credit Association) हा बचतीचा प्रकार भिशीशी संबंधित होता. हा प्रकार ग्रामीण बँकेच्या धरतीवर विकसित करण्यास सुरुवात झाली आहे. तसेच इंडोनेशियात (GTZ) या जर्मन फंडिंग एजन्सीने हा प्रयोग सर्वप्रथम केला आहे. येथे Self Help Group चा जन्म झाला. भारतामध्ये स्वयंसहाय्यता गटाची चळवळ 'म्हैसूर रिसेटलमें अँड डेव्हलपमेंट' एजन्सी (मायराडा) या संस्थेने सुरु केली. त्यांनी Credit Management Group निर्माण केले. महिला बचत गट ही केवळ कागदावरील शासकीय योजना नसून महिला सक्षमीकरणाची एक सुप्त क्रांतिकारी चळवळ आहे त्यामुळे कित्येक स्त्रियांना आत्मसन्मान मिळाला आहे. भारतात 1992 च्या दरम्यान बचत गटाच्या चळवळीला खरा वेग आला. बचत गटांमुळे महिलांमध्ये संघटनशक्ती, स्वविकास व सामाजिक विकासाची जाणीव निर्माण झाली. ग्रामीण भागात महिलांच्या सक्रीय सहभागामुळे गावोगावी स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ जोमाने वाढत आहे. बचत गटामुळे बचत संकलनाच्या कामाला चालना मिळवून पतनिर्मितीद्वारे रोजगार निर्माण होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. ग्रामीण परिसरातील दारिद्र्य निर्मूलनात बचत गट हे विकासाचे साधन बनत आहे. स्वयंसहाय्यता बचत गटाकडे महिलांचा आत्मविश्वास, आत्मनिर्भरता वाढत आहे

**स्वयंसहाय्यता गट आणि महिला सक्षमीकरण :**

समान प्रश्न, सारखे आचार विचार, समान मते असणारे स्त्री व पुरुष एकत्र येतात व नियमित बचतीच्या माध्यमातून आपल्या छोट्या मोठ्या आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगीण विकास साधतात त्यास स्वयंसहाय्यता गट म्हणतात. महाराष्ट्र स्वयंसहाय्यता गट चळवळ अतिशय जोरात आहे. या चळवळीच्या माध्यमातून महिला मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत. या चळवळीतून महिलांचा सर्वांगीण विकास साधण्यात मोठे यश आले आहे. सर्वच क्षेत्रात महिलांचा जो वावर आहे त्याला या चळवळीची मोठी ऊर्जा महिला सक्षमीकरणाचे महाराष्ट्र शासनाने अनेक प्रयत्न केले आहेत व त्याचे निष्कर्षही मिळाले आहेत. महिला सक्षमीकरणाचे शासन स्वयंसहाय्यता गटाबरोबरच विविध योजना आणि उपक्रप राबवित आहे. 82 टक्के महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला आहे.

शिक्षित आणि अल्पशिक्षित महिलांना लघु व गृहउद्योगाच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवून त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठीच रोजगार निर्मिती करुन इतर महिलांचे सक्षमीकरण करण्यास जिल्ह्यातील बचत गट पूरक ठरले आहेत. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे योगदान महत्त्वाचे आहे. सरकारी यंत्रणांची भूमिका मदतीची ठरली आहे. महिला बचत गट ही केवळ योजना नसून महिला सक्षमीकरणाची एक सुप्त क्रांतिकारी चळवळ बनली आहे. बचत गटातून महिलांमध्ये संघटनशक्ती, स्वविकास व सामाजिक विकासाची जाणीव निर्माण झाली. स्वंयसहायता बचत गटातून महिलांना स्वावलंबी करण्याचा उद्देश ठेवून राज्य सरकारने 1994 मध्ये महिला सक्षमीकरण धोरण जाहीर केले. या धोरणातूनच महिलांच्या बचत गटांना सुरुवात झाली. यासाठी राज्य सरकारच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महिला आर्थिक विकास महामंडळ, पंचायत समिती या सरकारी यंत्रणाबरोबर सामाजिक संस्था आणि जिल्हा बँकेचा महत्त्वाचा पुढाकार आहे. बचतगटाच्या माध्यमातून एकत्रित आलेल्या महिलांना गांडूळ खत, शेती व शेतीपूरक उद्योग, कुटीर उद्योग, सामूहिक शेती, कुक्कुटपालन, शेळी व म्हैस पालन, मळणीयंत्र, शेती यांत्रिकीकरण उपकरणे, गारमेंट्स, पार्लर, नर्सरी, कॉम्प्युटर लॅब, घरगुती पदार्थ आदी अनेक प्रकारच्या व्यवसायांसाठी अर्थपुरवठा करुन त्यांना स्वंयपूर्ण बनवण्यात आले आहे. एक लाखांपासून साडेचार लाख रुपयांचे विविध मुदतीत मिळत असलेल्या कर्जपुरवठ्यामुळे सध्यास्थिती सुमारे 36 हजार बचत विविध स्वरुपाची उत्पादन घेत आहेत.

आज महिलांनी अनेक उद्योग—व्यवसाय बचत गटाच्या माध्यमातून उभारले आहेत व त्यांनी तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी म्हणून शासनही प्रयत्नशील आहे. महिलांमध्ये असणारे संवादकौशल्य, वेळेचे नियोजन, अर्थकारणाची सांगड, जबाबदारीची जाणीव, जोखीम स्वीकारण्याची वृत्ती,

परिस्थिती हाताळण्याची कला, त्यामध्ये यशस्वी होण्याची क्षमता, नेतृत्व गुण, कामातील नीटसपणा, चोख व्यवहार या उपजत उद्योजकीय गुणांचा वापर करुन बचत गटातील महिला उद्योग क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द करु शकतात. महिला बचत गटांची स्थापना हा महिलांच्या सक्षमीकरणाच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे केवळ बचत करणे व कर्ज वाटणे एवढयापुरतीच बचत गटांच्या कार्यांची व्याप्ती नाही, त्यामुळे बचत गटांच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्न, विषय याबाबत चर्चा होणे आवश्यक आहे व त्यासाठी बचत गटामार्फत सामूहिकपणे काही कृती करता येईल काय, याचाही विचार झाला पाहिजे.

महिलांचे भारतीय अर्थव्यवस्थेमधील सहभागाचे निर्देशक हे त्याचा विविध कामांच्या क्षेत्रांमधील सहभाग, त्यांना सोपवलेल्या कामाचा दर्जा व त्यांचे स्थूल उत्पादनामधील (Gross Domestic Product - GDP) योगदान यावर अवलंबून असते. राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम (National Skill Development Program - NSDP) च्या अंतर्गत महिलांकरिता 231 विविध कौशल्य शिकवले जातात, ज्यामुळे त्या अर्थिक दृष्टीने स्वावलंबी होऊ शकतात. यामध्ये काळानुसार बदल विकास कार्यक्रम व राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम हे दोन्ही एकत्रितपणे कार्य केल्यास बदलत्या काळानुसार त्यांना नोकऱ्यांमध्ये संधी मिळेल. अर्थव्यवस्थेमध्ये महिलांचा अंतर्भाव करुन घेण्याकरिता आणखी एक बाब महत्वपूर्ण ठरली, ती म्हणजे मायक्रो फायनान्स होय. त्यामुळे स्वयंसाहाय्यता गटांना दुहेरी फायदा झाला. त्यांची बँकांमध्ये बचत झाली व कर्ज मिळण्याची सोयदेखील झाली. त्यामुळे कमी उत्पन्न गटातील महिला मोठ्या प्रमाणात आर्थिक दृष्टीने स्वावलंबी झाल्या. मार्च 2010 पर्यंत 69.53 लाख बचत गट हे नाबार्ड व SHG –(Bank Linkage Programme) च्या अंतर्गत नोंदणीकृत झाले आहेत. यापैकी 76% बचत गट केवळ महिलांचे आहेत. 72.5% यांची बचत बँकेमध्ये आहे व 82% यांनी कर्जाचा लाभ घेतलेला आहे.

**समारोप :**

जागतिक स्तरावरील स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा लक्षात घेता 1975 हे वर्ष 'बालिका वर्ष' म्हणून साजरे करण्याचे संयुक्त राष्ट्र संघाने जाहिर केले. 1975 ते 1985 हे 'महिला दशक' स्त्री प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी साजरा केला गेला तसेच 2001 हे वर्ष 'महिला सक्षमीकरण वर्ष' घोषित करण्यात आले. महिलांचे आर्थिक दृष्टीने स्वातंत्र्य ही आजच्या काळाची गरज आहे. महिलांच्या प्रगतीसाठी विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. ग्रामीण महिलांना तर प्रशिक्षण व रोजगार प्राप्त करुन देण्यासाठी कार्यक्रम 1987 मध्ये सुरु करण्यात आला. यामध्ये दुग्धव्यवसाय, पशुपालन, रेशीम उद्योग, हातमाग व सामाजिक वनीकरण या क्षेत्रात प्रशिक्षण दिले जाते. या योजनेमुळे 5,50,000 महिलांना लाभ झाला. 1995 'इंदिरा महिला योजना' 1998 मध्ये ग्रामीण महिला विकास व सक्षमीकरण प्रकल्प सुरुवातीस सहा राज्यांमधील स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून सुरु केला. तसेच गरीब व गरजू महिलांना कर्जाच्या सोयी उपलब्ध करुन देण्याकरिता 'राष्ट्रीय महिला कोष' स्थापना करण्या आले. अर्थव्यवस्थेमध्ये महिला अंतर्भाव करुन घेण्याकरिता आणखीएक बाब महत्वपूर्ण ठरली, ती म्हणजे मायक्रो फायनान्स यामुळे स्वंयसहाय्यता गटांना दुहेरी फायदा झाला. त्यांची बँकामध्ये बचत झाली व त्यांना कर्ज मिळण्याची सोयदेखील झाली. यामुळे कमी उत्पन्न गटातील महिला मोठ्या प्रमाणात आर्थिक दृष्टीने स्वावलंबी झाल्या. मार्च 2010 पर्यंत 69.53 लाख बचत गट हे नाबार्ड अंतर्गत नोंदणीकृत झाले आहेत. यापैकी 76% बचत गट महिलांचे आहे.

**संदर्भसुची :**

1. डॉ. अश्रु जाधव– ग्रामिण विकासातील आव्हाने, सर साहित्य केंद्र, नागपूर, 2013.
2. प्रा. डॉ. वर्षा गंगणे– स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव, ऋचा प्रकाशन, नागपूर 2015.
3. प्रा. देशपांडे. एस्. एस्.– मानवी हक्क, चेतन बुक्स, पुणे, 2014.
4. डॉ. महाजन वंदना – स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन, अथर्व पब्लिकेशन्स्, धुळे, 2013.